स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ, नांदेड-४३१६०६ , महाराष्ट्र

# विद्यार्थ्यासाठी उन्हाळी-२०२० परीक्षेसाठी महत्वाच्या सुचना

सर्व संबधीत विद्यार्थ्यांना सूचीत करण्यात येते की, मा.सर्वोच्च न्यायालय, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व विद्या परीषदेच्या निर्णयानुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व पदवी व पद्व्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील नियमीत व अंतीम सत्रातील ज्या विद्यार्थ्याचे मागील सत्राचे काही विषय अनुतीर्ण असतील तर या सर्व विषयांची उन्हाळी—२०२० परीक्षा घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी परीक्षा पध्दती निश्चित करण्यात आली असून, त्याकरीता विद्यार्थ्यांना खालील प्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) सध्या कोव्हीड—१९ या विषाणुच्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता व विद्यार्थ्यांच्या आरोग्यास प्राधान्य देण्याकरीता प्रचलित परीक्षा पध्दती म्हणजेच लेखी परीक्षा न घेता नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन नवीन परीक्षा पध्दतीनुसार परीक्षा घेण्याचे ठरले आहे.

२) सदर परीक्षा ही बहुपर्यायी **(MCQ)** ऑनलाईन किंवा ऑफलाईन पध्दतीद्वारे घेण्यात येणार असल्यामुळे. विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ देणे, महाविद्यालय स्तरावर नविन इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करणे या सर्व बाबीचा विचार करता पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांची परीक्षा व अंतिम सत्रातील ज्या विद्यार्थ्यांचे मागील सत्राचे कांही विषय अनुतीर्ण **(Backlog)** असतील तर त्या विषयांची परीक्षा दिनांक ०३ ऑक्टोबर २०२० ते २५ ऑक्टोबर २०२० दरम्यान होणार आहे. त्या त्या अभ्यासक्रमाच्या परीक्षाचे वेळापत्रक टप्याटप्याने विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येणार आहे.

३) वरील परीक्षेसाठी ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा आवेदनपत्र आजपर्यंत भरलेले नसल्यास त्यांना परीक्षा आवेदनपत्र दिनांक १० सप्टेंबर २०२० पर्यंत महाविद्यालयात सादर करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

४) वरील परीक्षा संदर्भाने ज्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा अद्यापपर्यंत झालेल्या नाहीत, त्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा दिनाक १५ सप्टेंबर २०२० ते २५ सप्टेंबर २०२० या कालावधीत घेण्यात येणार आहेत. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापपर्यंत प्रात्याक्षिक परीक्षा दिली नाही त्यांनी महाविद्यालयाशी संपर्क साधावा.

५) वरील परीक्षा हया रविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी पण घेण्यात येतील.

६) वरील सर्व परीक्षा बहुपर्यायी प्रश्न **(MCQ)** पध्दतीने घेण्यात येणार आहे. यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून ऑनलाईन Proctored Method ने घेतली जाणार आहे. तसेच ऑफलाईन पध्दतीने देखील परीक्षा घेतली जाईल.

७) या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थी घरी बसून देवू शकतील.

८) ही परीक्षा पध्दती प्रस्तुत विद्यापीठाच्या सर्व संलग्नीत महाविद्यालयातील पदवी, पद्व्युत्तर व पदवीका अभ्यासक्रम तसेच प्रस्तुत विद्यापीठातील सर्व संकुले व दूरशिक्षण अभ्यासक्रमासाठी लागू असेल.

९) ऑनलाईन परीक्षे दरम्यान काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबधीत विद्यार्थ्याला वाढवून देण्यात येईल. ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांना एक तासाचा कालावधी असेल. ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने परीक्षा एकाच वेळेस सुरू होतील याची नोंद घ्यावी.

१०) ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणे शक्य नाही अशा विद्यार्थ्यांची परीक्षा ऑफलाईन पध्दतीने ओएमआर **(OMR)** उत्तरपत्रिकेव्दारे महाविद्यालयीन परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. अशा परिस्थितीत एखादया विद्यार्थ्याने गावाजवळच्या परीक्षा केंद्राची मागणी केल्यास त्याने मागणी केलेले परीक्षा केंद्र देण्यात येईल. परंतु मागणी करण्यात आलेले परीक्षा केंद्र हे प्रस्तुत विद्यापीठ

परीक्षेत्रातील असावे. तसे विद्यार्थ्यांनी संमती पत्रात नमुद करणे आवश्यक आहे.

११) सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन/ऑफलाईन परीक्षा देणे बाबत संमतीपत्र दिनांक १५/९/२०२० पर्यंत त्यांच्या महाविद्यालय/संकुलामध्ये ई—मेलव्दारे किंवा प्रत्यक्षात भरुन दयावेत. सदर भरलेली संमती पत्रे महाविद्यालयांनी विद्यापीठात दिनांक २०/०९/२०२० पर्यंत विद्यापीठात सादर करावेत.

जे विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणेसाठी संमतीपत्र देणार नाहीत, अशा विद्यार्थ्यांना ऑफलाईन परीक्षा पध्दतीने परीक्षा दयावी लागेल. ऑनलाईन परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक व ईमेल आय.डी.संमती पत्रामध्ये अचूक नमूद करणे आवश्यक आहे.

१२) ऑनलाईन परीक्षा देणेसाठी स्मार्टफोन, लॅपटॉप, संगणक, इंटरनेट कनेक्टीवीटीची सोय करण्याची जबाबदारी ही संबंधीत विद्यार्थ्याची राहील.

१३) दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार ऑनलाईन, ऑफलाईन किंवा ओपन बुकद्वारे परीक्षा केंद्रावर परीक्षा देता येईल. याबाबत संमती पत्र भरून देणे आवश्यक आहे.

१४) ऑनलाईन पध्दतीने परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांना व महाविद्यालयातील शिक्षकांना **Mock Test** व इतर तांत्रिक

माहिती दिनांक २५ ते ३० सप्टेंबर २०२० दरम्यान देण्यात येईल.

१५) सदर पदवी व इतर अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी प्रश्नपत्रीका ही बहुपर्यायी (MCQ) पध्दतीची असेल त्यामध्ये ४० प्रश्न असतील प्रत्येक प्रश्नांसाठी १ गुण देण्यात येईल. सदर परीक्षेचा कालावधी हा १ तासाचा राहील. प्रत्येक प्रश्नांच्या उत्तरासाठी चार पर्याय असतील त्यापैकी विद्यार्थ्याने अचूक उत्तर निवडावा.

१६) पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रश्नपत्रिका ही ४० गुणांची असेल व प्रश्नपत्रिकेमध्ये ५० बहुपर्यायी (MCQ) प्रश्न असतील. सदर परीक्षेचा कालावधी हा एक तासाचा राहील. प्रत्येक प्रश्नांच्या उत्तरासाठी चार पर्याय असतील त्यापैकी विद्यार्थ्याने अचूक उत्तर निवडावे.

१७) या परीक्षेमध्ये निगेटिव्ह मार्कींग राहणार नाही.

१८) ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांनी परीक्षा सुरू होणेपूर्वी १५ मिनीटे अगोदर परीक्षा दालनात उपस्थित रहावे व परीक्षा संपल्यानंतर १५ मिनीटांमध्ये परीक्षा केंद्राच्या परीसरातून बाहेर पडावेत.

१९) ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांना पेपर सुरु झाल्यानंतर जास्तीत जास्त ३० मिनिटे उशिराने प्रवेश दिला जाईल तसेच परीक्षा सुरू झाल्यानंतर किमान ३० मिनिटानंतर परीक्षा कक्ष सोडण्यास परवानगी देण्यात येईल.

२३) ऑफलाईन पध्दतीने परीक्षा देणा—या विद्यार्थ्यांनी परीक्षा केंद्रावर जातांना तोंडाला मास्क बांधणे, परीक्षा केंद्रावर **Social Distancing** पाळणे बंधनकारक असेल. तसेच शासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या कोविड—१९ विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनाचे व सुचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

तरी परीक्षा देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

स्वा/—
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ